## महत्त्वाचे...

### करिअर निवडताना बदल ओळखा : शेख



**जुने नाशिक ।** विद्यार्थ्यांनी करिअर निवडताना केवळ सध्याच्या संधींवर न थांबता, भविष्यातील बदल आणि गरजांचा विचार करून निर्णय घ्यावा, असा सल्ला करिअर मार्गदर्शक आसीफ शेख यांनी दिला. ह्युमन पॅशन हेल्थ फाउंडेशनच्या वर्धापन दिनानिमित्त वडाळारोड मोहम्मदअली येथील साहिल लॉन्स येथे १०वी, १२वीच्या विद्यार्थ्यांसाठी करिअर मार्गदर्शन व गुणगौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. गुणवंत विद्यार्थ्यांना स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. प्रमुख पाहुणे म्हणून मविप्रचे सरचिटणीस अ‍ॅड. नितीन ठाकरे, माजी नगरसेवक संजय चव्हाण, जेएमसीटीचे संचालक हाजी रऊफ पटेल, मौलाना फय्याज बरकाती, सचिन खराटे, जोएब कुरेशी, समीर शेख, इम्तियाज शेख उपस्थित होते.

### मॉर्निंग ग्रुप परिवारातर्फे पालखी

**नाशिक ।** आषाढी एकादशीनिमित्त चेतनानगर येथील गामणे मैदानावरील मॉर्निंग ग्रुप परिवार, श्रीराम हास्य क्लब व गजानन हास्य क्लबतर्फे पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पुरोहीत उपाध्ये यांच्या निवासस्थानी विठुरायाची विधीवत अभिषेक व पूजन करण्यात आले. महेश हिरे, रश्मी हिरे, साहेबराव आव्हाड, पुष्पा आव्हाड, बाळकृष्ण शिरसाठ, राजेश पाटील, पुष्पा पाटील, सोमनाथ बोराडे, भगवान दोंदे, एकनाथ नवले, डॉ. एम. बी.पवार, प्रकाश सोनवणे, संजय मोरे, हिरामण पवार, अरूण पाटील, अनिल क्षिरसागर, तुकाराम येवले, गिरीश पाटील, दिगंबर अहिरे यांच्यासह भक्तगण सहभागी झाले होते.

### नियाज-ए-इमाम हुसैन कार्यक्रम

**जुने नाशिक ।** नाशिकच्या खानका- ए- कादरिया संस्थेच्या वतीने नियाज-ए-इमामे हुसैन या धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. हा कार्यक्रम अत्यंत श्रद्धा, भक्ती आणि आदरभावनेने पार पडला. भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून नियाजचा लाभ घेतला. विविध ठिकाणांहून आलेल्या भाविकांनी नियाजाचा लाभ घेतला. खानका ए कादरिया तर्फे सर्व उपस्थित भाविकांचे आणि सहकार्य करणाऱ्यांचे आभार व्यक्त करण्यात आले. परिसरात स्वच्छतेची योग्य व्यवस्था ठेवण्यात आली होती, तसेच शिस्तबद्ध आयोजनामुळे कोणत्याही अडथळ्याशिवाय संपूर्ण कार्यक्रम पार पडला.

### कारभारी म्हस्के यांना पुरस्कार



**सातपूर ।** ज्ञानगंगा क्लासेसचे संचालक प्रा. कारभारी म्हस्के यांना त्यांच्या शैक्षणिक कार्यात अविरत ३५ वर्षे पूर्ण झाल्यामुळे बी द चेंज फाउंडेशन आयोजित राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आला. शिर्डी येथे रविवारी (दि.२९) समारंभात आदर्श गाव योजनेचे कार्याध्यक्ष पद्मश्री डॉ. पोपटराव पवार यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. त्या यशाबद्दल शिक्षणमंत्री दादासाहेब भुसे, आ. सुहास कांदे, शिवसेना सचिव भाऊसाहेब चौधरी यांच्यासह अरुण घुगे, दीपक मौले यांनी प्रा. म्हस्के यांचे अभिनंदन केले.

# गोदावरीला पूरस्थिती कायम; नाशकात सात मि.मी. पावसाची नोंद

**नाशिक । प्रतिनिधी**

नाशिक जिल्ह्यात पावसाने अक्षरश: धुमाकूळ घातल्याचे चित्र आहे. जिल्ह्यातील अनेक धरणांतून विसर्ग होत असल्याने तर सात धरणे ओव्हरफ्लो झाली आहेत. गंगापूर धरणाच्या पाणलोट क्षेत्रात जोरदार पाऊस होत असल्याने धरणातून पाण्याचा मोठ्या प्रमाणावर विसर्ग करण्यात येत आहे. त्यामुळे गोदावरीला पूर आला आहे. सायंकाळी सहा वाजेपासून गंगापूर धरणातून विसर्ग कमी केल्यामुळे काही अंशाने नदीची पाणी पातळी कमी होण्यास सुरुवात झाली आहे. दुपारपर्यंत सुरू असलेल्या निसर्गामुळे गोदावरी नदीवरील पूरस्थिती कायम आहे. तर दुतोंड्या मारूतीच्या छातीपर्यंत पाणी पोहोचले होते.

शहरात दिवसभरात ७ मिमी पावसाची नोंद झाली आहे. नाशिक शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या गंगापूर धरणात ३४६९ दलघफू म्हणजेच ६१.६२ टक्के पाणीसाठा आहे तर मागील वर्षी या कालावधीत गंगापूर धरणात अवघा १३८५ दलघफू म्हणजे २४.६० टक्के पाणीसाठा शिल्लक होता. मागील वर्षीच्या तुलनेत गंगापूर धरणात ३७ टक्के अधिक पाणीसाठा आहे. जिल्ह्यातील आळंदी, भावली, वालदेवी, भाम, भोजापूर, हरणबारी, केळझर ही धरणे शंभर टक्के भरली असून धरणातून विसर्ग सुरू आहे. कश्यपी, गौतमी, गोदावरी, वाघाड, वाकी, पुणेगाव, मुकणे ही धरणे सत्तर टक्क्यांहून अधिक भरले आहेत. पाणी पातळीत वाढ होत असल्याने जिल्ह्यातील पंधरा धरणातून पाण्याचा विसर्ग सुरू आहे.

दरम्यान, पालखेड धरणातून ६४६ क्यूसेक वेगाने विसर्ग सुरू होता, मात्र त्यात ७१० क्यूसेकने वाढ करत १३५६ क्यूसेक वेगाने विसर्ग कादवा नदीत सोडण्यात आला. गंगापूर धरण पावसाचे प्रमाण घटल्यामुळे जगण्याच्या साठ्यात येणाऱ्या पाण्याचे प्रमाण कमी झाले. परिणामी धरणातील विसर्ग कमी करून ३९६९ एवढा ठेवण्यात आला.

नाशिक जिल्ह्यात कोसळत असलेल्या दमदार पावसामुळे धरणातून आतापर्यंत २ लाख, ८४ हजार २०० पाण्याचा विसर्ग करण्यात आला असून, २ लाख, ४५ हजार, ६४ दलघफू पाणी जायकवाडी धरणाकडे रवाना झाले आहे.



| धरण | – विसर्ग |
|---|---|
| दारणा | – ८,३४८ |
| गंगापूर | – ३,९६९ |
| नांदुरमधमेश्वर | – ३५,९१८ |
| पालखेड | – १३५६ |
| पुणेगाव | – ४५० |
| भोजापूर | – ८१० |
| भावली | – ७०१ |
| भाम | – १७९४ |
| वाकी | – ३६३ |
| वालदेवी | – ८१४ |
| आळंदी | – ४४६ |
| कश्यपी | – १०००० |
| मुकणे | – २५० |
| कडवा | – २०५६ |
| करंजगाव | – ९४५ |

# वरुणराजा रजेवर गेला तरच पिकांना काहीसे जीवदान

**नाशिक । प्रतिनिधी**

गेल्या चार मेपासून जिल्ह्यात पाऊस ठाण मांडून बसला आहे. ९ जुलैपर्यंत त्याचा मुक्काम कायम आहे. या सततच्या पावसामुळे डाळींब व द्राक्ष व करपा रोगाचा प्रादुर्भाव वाढू लागला आहे. लावलेला टॉमेटोही वाचतो की नाही, अशी भीती व्यक्त होऊ लागली आहे. आता पंधरा दिवस मिळणार आहे. खरीप हंगामावर संपूर्ण वर्षाचे अर्थकारण अवलंबून असते. खूप जास्त, खूप कमी किंवा चुकीच्या वेळी पाऊस पडल्याने संपूर्ण वर्षाचे प्रयत्न वाया जाऊ शकतात. यंदा काही भागात अतिपावसामुळे ती भीती निर्माण झाली आहे.



सुरुवातील वळवाचा पाऊस नेहमी पडतो म्हणून वातावरण निवळेल, अशी अपेक्षा होती. मात्र मे महिन्यात पावसाने मुक्काम ठोकला. खान्देश, नाशिक, नगर जिल्ह्यात ३ ते १० मेपर्यंत ढगाळ वातावरण होते. त्यातच चार मेला विजा, वारा व गडगडाटीचे वातावरण राहून, पावसाची सुरुवात झाली. हे अवकाळीचे वातावरण अरबी समुद्रात दीड किमी. उंचीपर्यंत घड्याळ काटा दिशेने फिरणाऱ्या प्रत्यावर्ती चक्रीय वाऱ्याच्या स्थितीमुळे महाराष्ट्रात ताशी ४५ ते ५० किमी वेगाने वाहणाऱ्या आर्द्रतायुक्त उत्तरी वाऱ्यामुळे झाले. त्यामुळे शहरात उन्हाळा फारसा जाणवलाच नाही. त्यानंतर मे महिन्याच्या मध्यावरच यंदा बंगालच्या उपसागरात मान्सूनची चाहूल लागली. मान्सून विषुववृत्त समांतर, पूर्वेकडून पश्चिमेकडे, प्रशांत महासागरीय प्रवास करत, मलेशिया, सिंगापूर, सुमात्रा बेटाचा उत्तरेकडील भाग ओलांडून भारताच्या अंदमान व निकोबार बेटांच्या दक्षिणेकडील आग्नेय बंगालच्या उपसागरात १३ मे दरम्यान मजल-दरमजल करत पोहोचला. त्यामुळे यंदा लवकर मान्सूनचे आगमन झाले. लवकर पावसाळा सुरु होणार म्हणून सर्वत्र आनंदोत्सव साजरा झाला.

मात्र आता या आनंदावर वीरजन पडत चालले आहे. आता वरुणराजा काही दिवस सुटीवर गेल्याशिवाय कोणालाही समाधान मिळणार नाही, अशी स्थिती आहे. कारण आतापर्यंत जेथे पाऊस थोड पडला आणि नंतर थांबला, तेथेच शेतकऱ्यांना नांगरणी, वखरणी करण्यास थोडा वेळतरी मिळाला. नाशिकच्या गिरणारे परिसरात या दिवसांत टोमॅटोची लागवड मोठ्या प्रमाणावर होते. तसेच कसमादे पट्ट्यात डाळींब घेतली जातात. नाशिकलगतच्या परिसरात द्राक्ष होतात. द्राक्षबागेत सध्या काडी पक्कवता गर्भधारणाचा काळ आहे. त्यासाठी ऊन आवश्यक असते. मात्र सततच्या पावसामुळे डाळींब व द्राक्षावर करपा रोगाचे आक्रमण होऊ लागले आहे. त्यामुळे किडरोगावरील खर्च वाढला आहे. आता टोमॅटोला ऊन मिळाले नाही तर ते हातचे पीक जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे. या पावसामुळे यंदाच्या द्राक्ष हंगामावरही त्याचा विपरित परिणाम होणार असून उत्पादन घटण्याची शक्यता आहे. आदिवासी तालुक्यात भात पिकाला मात्र सध्यातरी फारसा धोका नसल्याचे जाणवत आहे. भात महत्वाचे पीक आहे आणि ते प्रामुख्याने ओल्या जागी घेतले जाते. त्याला या पावसाचा फायदा झाला आहे.

## नवे साकडे घालावे लागणार

खरिपातील पिकांची पेरणी जून महिन्यात सुरु होते. जुलै महिन्यापर्यंत पेरण्या आटोपतात. काही वेळा पाऊस लांबला किंवा पावसाचा खंड पडला तर ऑगस्ट महिन्यात पेरण्या होतात. खरिपातील पिकांची काढणी सप्टेंबरपासून सुरु होते. मूग आणि उडदासारखी पिके लवकर येतात. नोव्हेंबरपर्यंत पिकांची काढणी सुरु असते. ते कापूस आणि तुरीसारख्या पिकांची लागवड खरिपात होते. मात्र काढणी जानेवारी,फेब्रुवारीपर्यंत चालते. ते कापूस, सोयाबीन, तूर, मूग, उडीद, मका, ज्वारी, बाजरी, भूईमूग, कारळे, कांदा ही प्रमुख खरीप पिके आहेत. यंदा पावसाळा लवकर सुरु झाला. त्यातही अखंड सुरु राहिल्याने खरिपाचे गणित बिघडत चालले आहे. पूर्वी पाऊस पडावा म्हणून जसे महादेवाला पाण्यात बुडवायचे, धोंड्या धोंड्या पाणी दे म्हणायचे, तसे आता पाऊस थोडे दिवस थांबावा, यासाठी नवे साकडे घालावे लागणार आहे.

# अनुदानित आश्रमशाळांचे वेतन दरमहा पाच तारखेच्या आत

### आदिवासी आयुक्त बनसोड यांचे आश्वासन

**नाशिक ।** अनुदानित आश्रमशाळांचे वेतन दरमहा ५ तारखेच्या आत होतील व या वर्षीपासून आश्रमशाळामध्ये नाट्य, संगीत गायन या विषयावर काम सुरू होईल, असे आश्वासन आदिवासी विकास आयुक्त लिना बनसोड यांनी दिले.

आदीवासी विकास विभाग अनुदानीत आश्रमशाळा कर्मचारी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष विक्रम गायकवाड व पदाधिकाऱ्यांनी आयुक्त बनसोड यांच्यासोबत विविध प्रश्नावर चर्चा केली. त्यात महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. आयुक्तांनी अनुदानित आश्रमशाळांचे वेतन दरमहा ५ तारखेच्या आत करावेत असे निर्देश दिले. एखादी शाळा बंद झाल्यावर कर्मचाऱ्यांचे नवीन शाळेवर समायोजन होईपर्यंतच्या प्रतीक्षा कालावधीचे वेतन कर्मचाऱ्यांना मिळाले पाहिजे, या मागणीवर आयुक्तांनी शिक्षकांच्या बाजूने सकारात्मक भूमिका घेतली. शाळा बंद होण्याच्या घटनेत शिक्षकांची चूक नसल्यामुळे शिक्षकांना वेतन मिळालेच पाहिजे, असा ठाम पुनरुच्चार करून पुन्हा प्रस्ताव पाठवण्याचे आदेश दिले.

पहारेकरी कर्मचाऱ्यास वेतनश्रेणी मिळण्याबाबतचा विषय न्यायप्रविष्ठ असल्यामुळे त्यावर सध्याच कोणताही निर्णय घेऊ शकत नाही असे त्या म्हणाल्या. अधीक्षक, अधीक्षिका दीर्घ रजेवर गेले असता त्या ठिकाणी प्रतिनियुक्तिवर कर्मचारी नेमण्याबाबत संस्थेला आदेशित करावे, ही मागणी मान्य केली.

याप्रसंगी संतोष राऊत, राजेश पाटील, संजय जाधव, निशाल विधाते, साहेबराव मोहोड, मनोज ठाकरे, लक्ष्मण मते, रखमाजी भड, सारिका गायकवाड, नामदेव वाजे, शंकर माने, चंद्रकांत शिरोळे, कपील पाटील, आर.आर.पाटील उपस्थित होते.

# पोलीस उपायुक्तपदी म्हस्के

## धुळ्याहून किशोर काळे हजर; बच्छाव, खांडवी यांचा सत्कार

**नाशिक। प्रतिनिधी**



भारतीय पोलीस सेवेतील आठ अधिकाऱ्यांना पदोन्नती देत राज्यातील विविध ठिकाणी उपायुक्त व अपर अधीक्षक पदावर नियुक्ती देण्यात आली आहे. त्यानुसार, नागपूर ग्रामीणचे सहाय्यक अधीक्षक अनिल रामदास म्हस्के (आयपीएस) यांची नाशिक पोलीस आयुक्तालयात उपायुक्त पदावर पदोन्नतीने बदली झाली आहे. तर, धुळे येथील अपर अधिक्षक किशोर काळे यांनी मंगळवारी आयुक्तालयात उपायुक्तपदी पदभार स्वीकारला.

गृह विभागाकडून बदल्यांचे आदेश काढले जात असून नव्या आदेशानुसार, नागपूर ग्रामीण पोलीस दलातील सहाय्यक अधीक्षक आणि सावनेर विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल म्हस्के यांची नाशिक शहर पोलीस आयुक्तालयात उपायुक्त पदावर बदली झाली आहे. दरम्यान, आयुक्त संदीप कर्णिक त्यांना कोणती जबाबदारी देणार, याकडे सर्वांचे लक्ष आहे. तसेच, शहर आयुक्तालयातून गुन्हे उपायुक्त प्रशांत बच्छाव यांची कोल्हापूरऐवजी नाशिकच्या नागरी हक्क संरक्षण विभागात सुधारित पदस्थापना करण्यात आली असून मुख्यालयाचे उपायुक्त चंद्रकांत खांडवी यांची धुळे येथील प्रशिक्षण केंद्रात बदली झाली आहे. तेदेखील सुधारित पदस्थापनेच्या प्रतीक्षेत आहेत. दरम्यान, थेट 'आयपीएस' असलेले म्हस्के यांची नाशिक शहरात बदली झाल्याने त्यांना गुन्हे विभागाची जबाबदारी दिली जाण्याची चर्चा आहे. तर किरणकुमार चव्हाण आणि मोनिका राऊत यांच्या बदलीचे आदेश जारी झालेले नाहीत. यांसह नाशिक ग्रामीणच्या मालेगाव येथील उपविभागीय अधिकारी सूरज भाऊसाहेब गुंजाळ (आयपीएस) यांची पदोन्नतीने परभरणीत अपर अधीक्षक पदावर नियुक्ती झाली आहे.

## 'एसीपीं'ची पदे रिक्त

पंचवटी व वाहतूक विभागाची जबाबदारी असलेल्या सहाय्यक पोलीस आयुक्त पद्मजा चव्हाण यांची अहिल्यानगरातील राज्य राखीव पोलीस दलाच्या समादेशक पदावर पदोन्नतीने बदली झाली आहे. त्यामुळे पंचवटी व वाहतूक ही दोन पदे रिक्त होत असून, विशेष शाखा व गुन्हे शाखांची जबाबदारी सध्या संदीप मिटके यांच्याकडे आहे. त्यामुळे एकूण तीन विभागांत सध्या सहाय्यक आयुक्तांची (एसीपी) नियुक्ती आवश्यक आहे.

## नव्या जुन्यांचा सत्कार

आयुक्तालयातून बदली झालेले प्रशांत बच्छाव, चंद्रकांत खांडवी, सहायक आयुक्त पद्मजा बढे यांचा आयुक्तालयाने निरोप समारंभात सत्कार करून शुभेच्छा दिल्या. किशोर काळे यांचे आयुक्तालयात स्वागत करण्यात आले.

# सतरा जुलैपासून सावाना नाट्यधारा

**नाशिक ।** नाशिकच्या सार्वजनिक वाचनालय संस्थेकडून स्थानिक कलावंतांच्या कलागुणांना वाव मिळावा, याकरिता सावाना नाट्यधारा या उपक्रमाचा पहिला प्रयोग गुरुवारर (दि.१७) सायंकाळी ६ वा. परशुराम साईखेडकर नाट्यगृहात होणार आहे.

मंगळवारी सावानात नाशिकमधील नाट्यसंस्था व सावाना पदाधिकारी यांची सभा संपन्न झाली. सावानाचे अध्यक्ष प्रा. दिलीप फडके यांच्या उपस्थितीत चिठ्ठी पध्दतीने वर्षभर होणाऱ्या नाटकांचे क्रम जाहीर करण्यात आले. यावेळी नाट्यगृह सचिव जयेश बर्वे उपाध्यक्ष डॉ. सुनील कुटे, वैद्य. विक्रांत जाधव, कार्याध्यक्ष संजय करंजकर, प्रमुख सचिव सुरेश गायधनी, सहा. सचिव प्रा. सोमनाथ मुठाळ, नाट्यगृह सचिव जयेश बर्वे, ग्रंथसचिव देवदत्त जोशी, अर्थसचिव गिरीश नातू, कार्यकारी मंडळ सदस्य अ‍ॅड. अभिजित बगदे, प्रेरणा बेळे, डॉ. धर्माजी बोडके, प्रशांत जुन्नरे, मंगेश मालपाठक उपस्थित होते.

# जिल्ह्यात दीड लाख वृक्षलागवडीचा संकल्प

**नाशिक । प्रतिनिधी**

मुख्यमंत्र्यांच्या वृक्षलागवडीच्या आवाहनाला प्रतिसाद देत नाशिक जिल्हा प्रशासनाने १६ जुलै रोजी जिल्हाभरात दीड लाख झाडे लावण्याचा निर्धार केला आहे. ही केवळ वृक्ष लागवड इव्हेंट न राहता, जिओ-ट्रॅकिंगच्या माध्यमातून झाडांचे संगोपनही सुनिश्चित केले जाणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी जलज शर्मा यांनी दिली.

जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवनात पार पडलेल्या बैठकीत शासनाच्या सर्वच विभागांचे अधिकारी, समाजसेवी संस्था आणि वृक्षप्रेमी संघटना सहभागी झाल्या होत्या. या बैठकीत विविध विभागांनी वृक्षलागवडीसाठी प्रत्येक विभागाची उद्दिष्टे निश्चित केली. बैठकीत विविध विभागांच्या अधिकाऱ्यांसह वृक्षप्रेमी दत्तू ढगे, मनोज साठे, अंबरीश मोरे, रोशन केदार, अपर्णा कोठावळे, योगेश बर्वे यांच्यासह अनेक वृक्षप्रेमी उपस्थित होते.

## विभागानुसार वृक्षलागवड उद्दिष्ट

जिल्ह्यातील प्रत्येक ग्रामपंचायतीस किमान ५० झाडे लावण्याचे उद्दिष्ट देण्यात आले आहे.त्यानुसार जिल्हातील १४०० ग्रामपंचायतींच्या माध्यमातून जिल्हा परिषद ७५,००० झाडे लावणार आहे.



महानगरपालिका ५,००० झाडे,
निमा व उद्योजक संघटना ४,००० झाडे
वन विकास महामंडळ १०,०००झाडे
वन विभाग ६०,०००झाडे
कृषी विभाग ५,०००झाडे
जलसंपदा विभाग ८,०००झाडे
सामाजिक वनीकरण ७,०००झाडे
जिल्हाधिकारी कार्यालय आवारात २००झाडे

सामाजिक वनीकरण विभागाच्या नर्सरीकडे एकूण १.६५ लाख रोपे उपलब्ध असून, गरज पडल्यास अन्य संस्थांकडूनही रोपे पुरवण्यात येणार आहेत.

## हरित कुंभ उपक्रमाचा प्रारंभ

या उपक्रमाचे स्वागत करत वृक्षप्रेमी राजेश पंडित यांनी सांगितले की, दरवर्षी सिंहस्थाच्या पार्श्वभूमीवर 'हरित कुंभ' उपक्रम राबवला जातो. यावर्षीची वृक्षलागवड हेच या उपक्रमाचे प्रारंभिक पाऊल आहे. जनमानसात वृक्षलागवड व संगोपनाबाबत उत्साह निर्माण करणे हे या मोहिमेचे मुख्य उद्दिष्ट राहणार आहे.

# तेजसने दिली नवसंजीवनी; नाशिक एचएएलमध्ये चार लढाऊ विमाने

## अस्त्र क्षेपणास्त्राची चाचणी ऑगस्टमध्ये

**नाशिक । प्रतिनिधी**

सन २०२० मध्ये मंदावलेल्या उत्पादन प्रक्रियेमुळे अस्तित्वाच्या संकटात सापडलेल्या नाशिकमधील एचएएल (हिंदुस्तान एरोनॉटिक्स लिमिटेड) कारखान्याला 'तेजस मार्क-१ ए' या स्वदेशी लढाऊ विमानांच्या ऑर्डरमुळे नवसंजीवनी मिळाली आहे. या वर्षी येथे चार तेजस विमाने तयार होणार असून, यातील पहिलं विमान याच महिन्यात भारतीय वायुदलाकडे सुपूर्द होणार आहे.

ऑगस्टमध्ये याच विमानातून 'अस्त्र' या स्वदेशी क्षेपणास्त्राची चाचणी घेतली जाणार आहे. याआधी मार्च २०२५ मध्ये बेंगळुरूहून तयार केलेल्या तेजसद्वारे ओडिशातील चांदीपूर येथे ही चाचणी यशस्वी झाली होती.



## स्वदेशी तेजसचे सामर्थ्य

तेजस हे भारताने डिझाइन व विकसित केलेले सुपरसॉनिक हलके लढाऊ विमान असून, मिग-२१ सारख्या जुन्या विमाने बदलण्यासाठी तयार करण्यात आले आहे. डेल्टा विंग डिझाइन, कॉम्पोझिट साहित्य, रडार, क्षेपणास्त्र क्षमता आणि गाशीतून इंधन भरण्याची क्षमता यामुळे तेजस ४.५ पिढीच्या अत्याधुनिक लढाऊ विमानांमध्ये गणले जाते. ते हवाई लढाई, जमिनीवर हल्ला आणि टोही अशा अनेक भूमिकांमध्ये कार्यक्षम असून, व नौदल दोघांकडून वापरले जाते. सध्या एकूण ३२४ तेजस विमाने सेवेत आणण्याच्या तयारीत आहे.

## नाशिक उत्पादन युनिट व प्रगती

एचएएलला एकूण ८३ तेजस विमानांची ४८ हजार कोटींची ऑर्डर मिळाली असून, यापैकी १६ विमाने नाशिकमध्ये तयार होणार आहेत. यासाठी १५० कोटींचा स्वतंत्र उत्पादन युनिट उभारण्यात आला असून, २०२३ पासून त्यात काम सुरू आहे. दरवर्षी आठ विमाने तयार करण्याची क्षमता आहे. प्रथम विमान मार्च २०२५ पर्यंत द्यायचे होते, परंतु अमेरिकेच्या कंपनीकडून ४०४-२० इंजिनाच्या उशीरामुळे विलंब झाला. आता इंजिन उपलब्ध असून, उड्डाण चाचण्या अंतिम टप्प्यात आहेत.

## 'अस्त्र' आकाशातील स्वदेशी हत्यार

'अस्त्र' हे डीआरडीओने विकसित केलेले १०० किमीहून अधिक अंतरावर मारा करणारे स्वदेशी क्षेपणास्त्र आहे. याआधी ही क्षमता केवळ अमेरिका, रशिया, फ्रान्सकडे होती. आता भारतही त्या यादीत सामील झाला आहे.

## जागतिक स्तरावर तेजसची छाप

एफ-१६, जेएफ-१७, मिराज यांसारख्या लढाऊ विमानांशी तुलना होईल अशी तेजसची गुणवत्ता आहे. भारतीय संरक्षणाच्या आत्मनिर्भरतेचे हे प्रतिकात्मक झेंडा ठरतो. नाशिकमधून तेजस निर्माण होणं ही केवळ औद्योगिक उभारी नव्हे, तर भारताच्या लष्करी ताकदीचा इतिहास घडवणारी घडामोड आहे.

# जी फोर स्मार्ट रेसिंग टेक्नो संस्थेतर्फे रॅली

**नाशिक । प्रतिनिधी**

चढउतार, डोंगर रांगा, नाले, चिखल, ओढे, अवघड वळणे अशा वाटांवरून वाहने सुरक्षितपणे चालवताना चालकांना आत्मविश्वास, प्रसंगावधान यांची आवश्यकता असते. कुशल, जागरूक व योग्य तांत्रिक माहिती असणारे वाहनचालक अपघात टाळू शकतात. याचे प्रशिक्षण देण्यात आले. जी फोर स्मार्ट रेसिंग टेक्नो संस्थेतर्फे ऑफ-रोड अलायन्स रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे.

पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर ही खास रॅली रायडर्ससाठी शैक्षणिक आणि अनुभवात्मक ठरली. यावेळी सहभागी वाहनचालकांना ऑफ रोड रायडिंगचे प्रशिक्षण, तसेच घ्यावयाची काळजी, सुरक्षिततेसाठी आवश्यक तंत्रे याविषयी मार्गदर्शन करण्यात आले.

सोमवारी सकाळी ८ वाजता त्र्यंबक रोडवरील काउंटी राँच येथे रॅलीचा घोडेस्वारीने प्रारंभ झाला. संयोजक गणेश लोखंडे व मयंक कड यांनी स्वागत, प्रास्ताविक केले. जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य अधिकारी अर्जुन गुंडे, ग्रामीण विभागाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मधुकर कड, ग्रेप काऊंटीचे संचालक किरण चव्हाण, काऊंटी राँचचे संचालक समीर खान यांच्या हस्ते उद्घाटन झाले. सायंकाळी समारोप करण्यात आला.

रविंद्रन आर, धर्मेश पांचाळ, अधिराज चांदवडकर, आकाश काळे, नरेन महाजन, हर्षल गबाळे, अमरिश पटेल, ऋषिकेश मोरे, संदीप खैरनार, मयूर रौंदळ व सहकाऱ्यांनी परिश्रम घेतले. रविवारी (दि. १३) मान्सून मडपॅक २०२५ रॅली होईल.